
# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता दहावी



# भारताचे संविधान

## भाग ४ क

## नागरिकांची मूलभूत कर्तव्ये

**अनुच्छेद ५१ क**

**मूलभूत कर्तव्ये – प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य असेल की त्याने –**

(क) प्रत्येक नागरिकाने संविधानाचे पालन करावे. संविधानातील आदर्शांचा, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर करावा.

(ख) स्वातंत्र्याच्या चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शांचे पालन करावे.

(ग) देशाचे सार्वभौमत्व, एकता व अखंडत्व सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्नशील असावे.

(घ) आपल्या देशाचे रक्षण करावे, देशाची सेवा करावी.

(ङ) सर्व प्रकारचे भेद विसरून एकोपा वाढवावा व बंधुत्वाची भावना जोपासावी. स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणतील अशा प्रथांचा त्याग करावा.

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन करावे.

(छ) नैसर्गिक पर्यावरणाचे जतन करावे. सजीव प्राण्यांबद्दल दयाबुद्धी बाळगावी.

(ज) वैज्ञानिक दृष्टी, मानवतावाद आणि जिज्ञासूवृत्ती अंगी बाळगावी.

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे जतन करावे. हिंसेचा त्याग करावा.

(ञ) देशाची उत्तरोत्तर प्रगती होण्यासाठी व्यक्तिगत व सामूहिक कार्यात उच्चत्वाची पातळी गाठण्याचा प्रयत्न करावा.

(ट) ६ ते १४ वयोगटातील आपल्या पाल्यांना पालकांनी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

शासन निर्णय क्रमांक : अभ्यास–२११६/(प्र.क्र.४३/१६) एसडी–४ दिनांक २५.४.२०१६ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या दिनांक २९.१२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये हे पाठ्यपुस्तक सन २०१८–१९ या शैक्षणिक वर्षापासून निर्धारित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# इतिहास व राज्यशास्त्र

## इयत्ता दहावी

सा विद्या या विमुक्तये

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

| | |
|---|---|
| 29N3VK | आपल्या स्मार्टफोनवरील DIKSHA App द्वारे पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पृष्ठावरील Q.R. Code द्वारे डिजिटल पाठ्यपुस्तक व प्रत्येक पाठामध्ये असलेल्या Q.R.Code द्वारे त्या पाठासंबंधित अध्ययन–अध्यापनासाठी उपयुक्त दृक्–श्राव्य साहित्य उपलब्ध होईल. |

**प्रथमावृत्ती : २०१८**
**पुनर्मुद्रण : ऑक्टोबर २०२०**

**© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे ४११ ००४.**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

**इतिहास विषय समिती**

डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष
श्री. मोहन शेटे, सदस्य
श्री. पांडुरंग बलकवडे, सदस्य
डॉ. शुभांगना अत्रे, सदस्य
डॉ. सोमनाथ रोडे, सदस्य
श्री. बापूसाहेब शिंदे, सदस्य
श्री. बाळकृष्ण चोपडे, सदस्य
श्री. प्रशांत सरूडकर, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**नागरिकशास्त्र विषय समिती**

डॉ. श्रीकांत परांजपे, अध्यक्ष
प्रा. साधना कुलकर्णी, सदस्य
डॉ. प्रकाश पवार, सदस्य
प्रा. अजिंक्य गायकवाड, सदस्य
प्रा. संगीता आहेर, सदस्य
डॉ. मोहन काशीकर, सदस्य
श्री. वैजनाथ काळे, सदस्य
श्री. मोगल जाधव, सदस्य-सचिव

**इतिहास व नागरिकशास्त्र अभ्यास गट**

श्री. राहुल प्रभू
श्री. संजय वझरेकर
श्री. सुभाष राठोड
सौ. सुनीता दळवी
डॉ. शिवानी लिमये
श्री. भाऊसाहेब उमाटे
डॉ. नागनाथ येवले
श्री. सदानंद डोंगरे
श्री. रवींद्र पाटील
सौ. रूपाली गिरकर
डॉ. मिनाक्षी उपाध्याय
डॉ. रावसाहेब शेळके
डॉ. सतीश चापले
श्री. विशाल कुलकर्णी
प्रा. शेखर पाटील
श्री. रामदास ठाकर
डॉ. अजित आपटे
डॉ. मोहन खडसे
सौ. शिवकन्या कदेरकर
श्री. गौतम डांगे
डॉ. व्यंकटेश खरात
श्री. रविंद्र जिंदे
डॉ. प्रभाकर लोंढे
डॉ. मंजिरी भालेराव
प्रा. शशि निघोजकर

**लेखक**

**इतिहास**

डॉ. शुभांगना अत्रे
डॉ. गणेश राऊत

**राज्यशास्त्र**

डॉ. वैभवी पळसुले

**मुखपृष्ठ व सजावट**

श्री. देवदत्त प्रकाश बलकवडे

**अक्षरजुळणी**

मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे

**कागद**

७० जी.एस.एम.क्रिमवोव्ह

**मुद्रणादेश**

N/PB/2021-22/Qty.- 1,00,000

**मुद्रक**

M/s. Digital Print System & Solutions Pvt. Ltd., Ahmednagar

**संयोजक**

श्री. मोगल जाधव
विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
सौ. वर्षा सरोदे
सहायक विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे.

**निर्मिती**

श्री. सच्चितानंद आफळे,
मुख्य निर्मिती अधिकारी
श्री. प्रभाकर परब,
निर्मिती अधिकारी
श्री. शशांक कणिकदळे,
सहायक निर्मिती अधिकारी

**प्रकाशक**

श्री. विवेक उत्तम गोसावी, नियंत्रक
पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,
प्रभादेवी, मुंबई-२५.

# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

## राष्ट्रगीत

जनगणमन–अधिनायक जय हे
भारत–भाग्यविधाता ।
पंजाब, सिंधु, गुजरात, मराठा,
द्राविड, उत्कल, बंग,
विंध्य, हिमाचल, यमुना, गंगा,
उच्छल जलधितरंग,
तव शुभ नामे जागे, तव शुभ आशिस मागे,
गाहे तव जयगाथा,
जनगण मंगलदायक जय हे,
भारत–भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे,
जय जय जय, जय हे ।।

## प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

विद्यार्थी मित्रांनो,

इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र विषयाचे अध्ययन तुम्ही 'परिसर अभ्यास'मध्ये केले आहे. इयत्ता सहावीपासून अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे स्वतंत्र विषय आहेत. इयत्ता सहावीपासून या दोन्ही विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता दहावीचे पाठ्यपुस्तक तुमच्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

पाठ्यपुस्तकाची रचना विषय नीट समजावा, मनोरंजक वाटावा, या हेतूने केलेली आहे. या पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासाने ज्ञानाबरोबरच तुम्हांला आनंद मिळावा असे आम्हांला वाटते. त्यासाठी पाठ्यपुस्तकात रंगीत चित्रे दिलेली आहेत. पाठ्यपुस्तकातील प्रत्येक पाठ लक्षपूर्वक अभ्यासावा. त्यातील जो भाग तुम्हांला समजणार नाही तो भाग शिक्षक, पालक यांच्याकडून समजावून घ्यावा. दिलेल्या चौकटींतील मजकूर तुमच्या ज्ञानात भरच घालेल! अधिक माहितीसाठी 'ॲप'च्या माध्यमातून क्यू.आर.कोडद्‌वारे प्रत्येक पाठासंबंधी उपयुक्त दृक्-श्राव्य साहित्य आपणांस उपलब्ध होईल. त्याचा अध्ययनासाठी निश्चितच उपयोग होईल. इतिहास हा विषय रंजक असून तो आपला मित्र आहे, असे समजून हे पुस्तक अभ्यासले तर तुम्हांला त्याची गोडी निश्चितपणे लागेल.

इतिहासाच्या भागात 'उपयोजित इतिहास' दिलेला आहे. इतिहास हा एक कुतुहलाचा विषय आणि छंद म्हणून अनेकांच्या आवडीचा असतो. परंतु तो शालेय अभ्यासक्रमात खरोखरीच किती आवश्यक आहे, यावर विशेष लक्ष केंद्रित केल्यास पुढील आयुष्यात विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतील, त्यांनी अंगीकारलेल्या व्यवसायात त्यांना त्या विषयाच्या अभ्यासाचा काही विशेष लाभ होईल का, यासंबंधी अनेकांच्या मनात साशंकता असते. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही साशंकता दूर करणे कठीण जाते. ती माहिती या पाठ्यपुस्तकाद्‌वारे 'इतिहास' या विषयात उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. रोजच्या जीवनातील कोणतीही गोष्ट असो, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या त्या गोष्टींचा, त्या त्या व्यावसायिक क्षेत्रांच्या विकासाचा स्वतःचा इतिहास असतो. त्या इतिहासाच्या ज्ञानाचा व्यवसायातील कौशल्यवाढीसाठी उपयोग होतो, ही बाब या पाठ्यपुस्तकात स्पष्ट केलेली आहे.

राज्यशास्त्राच्या भागात 'भारतीय संविधानाची वाटचाल' याविषयी माहिती देण्यात आली आहे. यामध्ये निवडणूक प्रक्रियेची माहिती, राष्ट्रीय व प्रादेशिक पातळीवरील प्रमुख राजकीय पक्ष, त्यांची भूमिका, लोकशाहीला सक्षम करणाऱ्या सामाजिक व राजकीय चळवळी तसेच भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने यांबाबत चर्चा केलेली आहे. या वर्गातील विद्यार्थी लवकरच मतदार होणार आहेत. या नव्या भूमिकेसाठी विद्यार्थ्यांना सक्षम करण्यासाठी पाठ्यपुस्तकातील आशय उपयुक्त आहे.

**(डॉ.सुनिल मगर)**
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ मार्च २०१८, गुढीपाडवा
भारतीय सौर दिनांक : २७ फाल्गुन १९३९

# – शिक्षकांसाठी –

'इतिहास' हा एक कुतुहलाचा विषय आणि छंद म्हणून अनेकांच्या आवडीचा असतो. परंतु तो शालेय अभ्यासक्रमात खरोखरीच किती आवश्यक आहे, त्यावर विशेष लक्ष केंद्रित केल्यास पुढील आयुष्यात मुलांना कोणत्या प्रकारच्या व्यावसायिक संधी उपलब्ध होऊ शकतील किंवा त्यांनी अंगीकारलेल्या व्यवसायात त्यांना त्या विषयाच्या अभ्यासाचा काही विशेष लाभ होईल का, यासंबंधी बहुतेकांच्या मनात साशंकता असते. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्यामुळे ही साशंकता दूर करणे कठीण भासते. ती माहिती या पाठ्यपुस्तकाद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

इतिहासाची अभ्यासपद्धती आणि इतिहासलेखन म्हणजे काय, तसेच इतिहासलेखनाचा इतिहास या गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना आतापर्यंत फक्त महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय पातळीवरच करून दिली जात असे. शालेय अभ्यासक्रमात त्याचा समावेश केला गेला नव्हता. त्यामुळे इतिहासाची शास्त्रशुद्ध पद्धती म्हणजे काय, याबद्दल विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन, या पाठ्यपुस्तकात इतिहासलेखन या विषयावर पहिल्या दोन पाठांत सुलभ पद्धतीने थोडक्यात माहिती दिलेली आहे.

फक्त विविध राजसत्ता आणि त्यांच्यामधील युद्धे तसेच थोर योद्ध्यांच्या पराक्रमाच्या कथा एवढ्यापुरताच इतिहास मर्यादित नसतो, या गोष्टीची जाणीव शालेय विद्यार्थ्यांना इतिहासाच्या पाठ्यपुस्तकांमधून वेळोवेळी करून देण्यात आलेली आहे. तरीही या गोष्टींच्या पलीकडचा इतिहास म्हणजे नेमके काय आणि इतिहासाचा वर्तमानाशी प्रत्यक्ष संबंध कसा असतो, याचे आकलन करून घेण्याची संधी शालेय विद्यार्थ्यांना प्राप्त होत नव्हती, ही बाब विशेषत्वाने डोळ्यांसमोर ठेवून दहावीच्या अभ्यासक्रमाची आखणी केली गेली. या पाठ्यपुस्तकातील पाठांची आखणीही त्या अनुषंगाने केलेली आहे.

वास्तविक पाहता इतिहासाचे रोजच्या व्यावहारिक जीवनाशी अत्यंत घट्ट नाते आहे. ते स्पष्ट करणारी 'उपयोजित इतिहास' किंवा 'जनांसाठी इतिहास' ही नवीन ज्ञानशाखा गेल्या काही दशकांमध्ये विकसित होऊ लागलेली आहे. परदेशांमधील विद्यापीठांमधून या विषयाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. या पाठ्यपुस्तकात या नवीन विषयाची माहिती करून देण्याबरोबरच विविध व्यवसायांतील मूल्यवर्धित सेवांसाठी इतिहासाच्या सखोल अभ्यासाची तसेच असा अभ्यास असणाऱ्या जाणकार इतिहासकारांची आवश्यकता कशी भासते, तेही सांगितले आहे. त्यासाठीचे अभ्यासक्रम आणि ते अभ्यासक्रम जिथे उपलब्ध आहेत अशा संस्थांची माहिती करून दिलेली आहे.

रोजच्या जीवनातील कोणतीही गोष्ट असो, व्यवसायाचे कोणतेही क्षेत्र असो, त्या त्या गोष्टीचा, त्या त्या व्यावसायिक क्षेत्राच्या विकासाचा स्वतःचा इतिहास असतो आणि त्या इतिहासाच्या ज्ञानाचा व्यवसायातील कौशल्यवृद्धीसाठी उपयोग होतो, ही बाब या पाठ्यपुस्तकात स्पष्ट केलेली आहे.

महाविद्यालयीन प्रवेशाच्या उंबरठ्यावर उभे असलेल्या दहावीच्या विद्यार्थ्यास पदवी मिळवण्यासाठी आणि पुढील आयुष्यातील प्रगतीसाठी अनुकूल व्यवसाय निवडता यावा म्हणून योग्य दिशा कशी ठरवायची याबद्दल अनेक प्रश्न असतात. विशेषतः इतिहास विषयामध्ये प्रावीण्य मिळवण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन देणारी पुस्तके अभावानेच उपलब्ध आहेत. या पाठ्यपुस्तकाद्वारे ती त्रुटी भरून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी उपयुक्त माहितीबरोबर रंजक माहिती आणि संयुक्तिक चित्रे यांचाही समावेश करण्यात आला आहे.

शालेय पातळीवरील नागरिकशास्त्र आणि राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमात सामाजिक-राजकीय परिसराची ओळख इथपासून ते आंतरराष्ट्रीय संबंध आणि आपल्या देशातील राजकीय प्रक्रियांचे स्वरूप इतका व्यापक आशय समाविष्ट केला आहे. या आशयाची अध्ययन उद्दिष्टे आपण अध्यापनातून साध्य करालच, पण त्याचबरोबर इयत्ता दहावीत मात्र वर्गातील आंतरक्रिया माहितीवजा असू नयेत. त्या दैनंदिन घटना व घडामोडींशी जोडल्या जाव्यात. भारतीय लोकशाहीसमोर आव्हाने नक्कीच आहेत, परंतु लोकशाही बळकट करणाऱ्या परंपराही मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आहेत. त्याचे वस्तुनिष्ठ विवेचन चर्चा, संवाद यांद्वारे होऊ शकेल. छोट्या गटांमधून विद्यार्थ्यांना अभिव्यक्त होण्यास संधी असावी.

पाठ्यपुस्तकातील आशयाची मांडणी विद्यार्थ्यांमध्ये नवे काही तरी शिकण्याची उर्मी निर्माण करणारी आहे. त्याला शिक्षक व पालक पूर्ण पाठिंबा देतील, यात शंका नाही.

## क्षमता विधाने

| क्र. | घटक | क्षमता |
|---|---|---|
| १. | प्राचीन ते आधुनिक कालखंडातील इतिहासाचे चिकित्सक समालोचन | • इतिहासलेखनाची परंपरा स्पष्ट करणे.<br>• इतिहासलेखनाचे शास्त्र विकसित होण्यात अनेक पाश्चात्त्य विचारवंतांचा हातभार लागला हे जाणून घेणे.<br>• भारतीय इतिहासातील विविध कालखंडाचा चिकित्सक, तुलनात्मक अभ्यास करता येणे.<br>• भारतात तसेच जगात झालेल्या ऐतिहासिक संशोधनाची माहिती मिळवता येणे.<br>• इतिहास हा शास्त्रशुद्ध अभ्यासविषय आहे हे सांगता येणे. |
| २. | उपयोजित इतिहास | • उपयोजित इतिहासाची संकल्पना सांगता येणे.<br>• इतिहासाचे विविध विषयात व जीवनात होणारे उपयोजन समजून घेणे व आचरणात आणणे.<br>• ऐतिहासिक घटनांचे समकालीनत्व ओळखता येणे.<br>• ऐतिहासिक लेखनातील विविध विचार प्रवाहांची ओळख करून घेणे. |
| ३. | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | • विविध प्रसारमाध्यमे व इतिहास यांच्यातील सहसंबंध ओळखता येणे.<br>• विविध प्रसारमाध्यमातील माहितीच्या आधारे तटस्थपणे स्वतःचा ऐतिहासिक दृष्टिकोन विकसित करता येणे.<br>• संबंधित व्यवसायातील व्यावसायिक क्षेत्रांची माहिती मिळवणे. |
| ४. | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास | • मनोरंजनाची आवश्यकता स्पष्ट करता येणे.<br>• मनोरंजनाची माध्यमे व इतिहास यांच्यातील परस्पर संबंधांचे विश्लेषण करता येणे.<br>• मनोरंजनाच्या माध्यमांत होणारे बदल जाणून घेणे. |
| ५. | कला, क्रीडा व साहित्य क्षेत्र आणि इतिहास | • भारतातील विविध कलांची माहिती सांगता येणे.<br>• भारतीयांच्या वेगवेगळ्या खेळातील कामगिरीविषयी अभिमान बाळगणे व त्यातून प्रेरणा घेणे.<br>• कला, क्रीडा व साहित्य क्षेत्रांतील विविध घटकांची माहिती सांगणे.<br>• कला, क्रीडा व साहित्य यांचे ऐतिहासिक उपयोजन सांगता येणे. |
| ६. | पर्यटन आणि इतिहास | • पर्यटन क्षेत्रासाठी इतिहासाचा उपयोग होऊ शकतो हे जाणणे.<br>• आपल्या देशातील पर्यटनाच्या संधी सांगता येणे.<br>• पर्यटन अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देते हे जाणणे.<br>• इतिहास आणि पर्यटन यांचा सहसंबंध समजून घेणे. |
| ७. | इतिहास व अन्य क्षेत्रे | • इतिहासाच्या अभ्यासातील संग्रहालयांचे/ग्रंथालयांचे महत्त्व सांगता येणे.<br>• इतिहासाच्या अभ्यासातून वस्तुनिष्ठ विश्लेषण करता येते ही भावना विकसित करणे.<br>• इतिहासाचा अन्य अभ्यासक्षेत्रांशी समन्वय साधणे. |

# अनुक्रमणिका

## उपयोजित इतिहास


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | इतिहासलेखन : पाश्चात्त्य परंपरा | १ |
| २. | इतिहासलेखन : भारतीय परंपरा | ७ |
| ३. | उपयोजित इतिहास | १५ |
| ४. | भारतीय कलांचा इतिहास | २२ |
| ५. | प्रसारमाध्यमे आणि इतिहास | ३२ |
| ६. | मनोरंजनाची माध्यमे आणि इतिहास | ३९ |
| ७. | खेळ आणि इतिहास | ४६ |
| ८. | पर्यटन आणि इतिहास | ५२ |
| ९. | ऐतिहासिक ठेव्यांचे जतन | ५९ |